# रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी सामाजिक बांधिलकी जपली

## -नामदार सुनिल तटकरे

पनवेल(प्रतिनिधी) रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी कला, कीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध उपक्रमातून सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री व रायगडचे पालकमंत्री सुनिल तटकरे यांनी नविन पनवेल येथे केले. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल तालुका आणि शहर कॉंग्रेस कमिटीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मल्हार महोत्सवाला नामदार सुनिल तटकरे यांनी शुक्रवारी भेट दिली. त्याप्रसंगी ते बोलत होते.

ना.तटकरे पुढे म्हणाले की, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांना सन्मानित करण्याचे काम मल्हार महोत्सवाच्या माध्यमातून होत आहे. कला, कीडा, सांस्कृतिक अशा विविध कार्यकमांची रेलचेल असलेला हा मल्हार महोत्सव लोकोपयोगी महोत्सव म्हणून नावारूपाला आला आहे. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून देश पातळीवरील क्रिडापटू व कलाकार घडविण्यासाठी या महोत्सवातून संधी दिली जात असून हा महोत्सव महिलांना समर्पित करून महिलांनाही व्यासपीठ मिळवून देण्याचे काम झाले आहे असे ना.तटकरे यांनी सांगून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून झालेल्या विकासकामांचा उल्लेख करून पनवेलच्या पर्यायाने रायगडच्या विकासासाठी एकत्रित राहून काम करत राहू, अशीही ग्वाही ना.तटकरे यांनी यावेळी दिली. कला, कीडा, शैक्षणिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांना यावेळी नामदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते 'रायगड गौरव' व 'पनवेल गौरव' पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

या कार्यकमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मधुशेठ ठाकूर, पनवेलचे उपविभागीय अधिकारी सुदाम परदेशी, तहसीलदार पवन चांडक, नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे सभापती वाय्.टी.देशमुख, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, सचिव महेंद्र घरत, नगराध्यक्षा चारूशिला घरत, माजी नगराध्यक्ष स्मिता वाणी, माजी उपनगराध्यक्ष कमलाकर मोरे, माहिती व जनसंपर्क विभागीय उपसंचालक डॉ.गणेश मुळये, पनवेल शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष जयंत पगडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते भीमसेन माळी, सतिश पाटील, रामदास शेवाळे, पनवेल नगरपरिषदेतील कॉंग्रेसचे गटनेते अनिल भगत, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, नगरसेवक शिवदास कांबळे, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, नगरासेवक मनोहर म्हात्रे, नगरसेविका स्मिता पाटील, कल्पना ठाकूर, सिता पाटील, उद्योजक विजय लोखंडे, राष्ट्रीय टेबल टेनिसपटू संजय कडू, महिला कॉंग्रेसच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, तालुका कॉंग्रेसचे उपाध्यक्ष के.ए.म्हात्रे, नविन पनवेल विभागीय अध्यक्ष कुमार नाईक, रोजगार व स्वयंरोजगार सेलचे तालुकाध्यक्ष राज सदावर्ते, रविंद्र नाईक, विलास भगत, मनोहर मुंबईकर, रामनाथ पाटील, अनेश ढवळे, दिनेश शिरसाट, गव्हाणच्या सरपंच रत्नप्रभा घरत, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, माजी नगरसेविका नलिनी शेलार, विद्या चव्हाण, सुगंधा कोळी, संतोषी मोरे, अस्मिता गोसावी, ॲड.दिपाली बांद्रे, कस्तुरी जंगम, सारिका मोरे, मनिषा चिले, कुंदा मेंगडे आदी मान्यवरांसह रसिक प्रेक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.